


दैनिक **आरंभपर्व**
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : २७८ ● मंगळवार, दि. ३० जुलै २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 278 ● Tuesday, 30 July 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-

# चासकमान धरणाचे पाचही दरवाजे उघडले

## नदीपात्रात व कालव्याद्वारे विसर्ग सुरू



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्याच्या पश्चिम भागात व भीमाशंकर अभयारण्य परिसरात पडत असलेल्या दमदार व संततधार पावसाने 8.53 टिएमसी क्षमता असलेले चासकमान धरण 80.66 टक्के भरले आहे. खबरदारीचा उपाय व संभाव्य जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता गृहीत धरून चासकमान धरणाचे पाचही दरवाजे 30 सेंटिमिटरने गुरूवारी (दि.25) रात्री उशीरा, पावणेबारा वाजता उघडून सांडव्याद्वारे एकूण 4 हजार 545 क्युसेक वेगाने भीमा नदीपात्रात विसर्ग सुरु करण्यात आला आहे. तसेच शुक्रवारी (दि.26) दुपारी अडीच वाजता डाव्या कालव्यातून 150 क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. चासकमान धरण पाणलोट क्षेत्रात सरासरी एकूण 553 मिलिमिटर इतकी पावसाची नोंद करण्यात झाली असून मागील 24 तासांत 66 मिलिमिटर इतकी पावसाची नोंद करण्यात झाली आहे. भीमा व आरळा नदीद्वारे चासकमान धरणात सुमारे 17 हजार क्यूसेक्स वेगाने पाण्याची आवक होत आहे. चासकमान धरणासह कळमोडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे धरणाच्या वरील बाजूस असलेल्या आरळा नदी बरोबरच भीमा नदीने रौद्र रूप धारण केले असल्याने नद्यांचे पात्र दुथडी भरून वाहू लागले आहे. नद्यांमधील सर्व पाणी चासकमान धरणामध्ये येत असल्याने धरणामधील पाण्याचा विसर्ग कमी जास्त प्रमाणात करण्यात येत आहे.

### गुंडाळवाडी येथील पुलावरून पुराचे पाणी

खेड तालुक्यातील गुंडाळवाडी येथील शिरूर भीमाशंकर राज्य मार्गावर असलेल्या पुलावरून ओढ्याचे पाणी गेल्याने बराच काल वाहतूक संथ गतीने चालू आहे. तर काही वाहनचालक जीव धोक्यात घालून पुराच्या पाण्यातून वाहन घेऊन जात प्रवास करत होते. वाडा गावाकडे जाणारा व खेड तालुक्याच्या पश्चिम भागाला जोडनारा हा मुख्य रस्ता असून तीर्थक्षेत्र भीमाशंकर येथे जाणारा जवळचा रस्ता म्हणून या मार्गावर मोठ्या प्रमाणात नेहमी वर्दळ असते. गेले दोन तीन दिवस चालू असलेल्या संततधार पावसाने परिसर जलमय झाला असून डोंगरदऱ्यातील येणारे पाणी ओढ्या मार्गे भीमानदीस जावून मिळत असते. परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने ओढ्यानाल्यांना नदीला पुर आले असून रस्ते जलमय झाले आहेत. दरवर्षी या पुलावरून पावसाचे पाणी जात असते. नागरिकांना धोकादायक प्रवास करावा लागत आहे. या मार्गाची नुकतीच दुरस्ती करण्यात आली मात्र या पुलाची उंची न वाढवता दुरुस्ती केली. या पुलाला कोणत्याही प्रकारचे संरक्षण कठडे अथवा रेलिंग नसल्याने पुराचे पाणी आल्यास दुर्घटना होण्याची शक्यता नागरिक व्यक्त करत आहे. पाण्याचा प्रवाह जोरात असल्याने त्यामध्ये अनेक झाडे झुडपे वाहत येत आहे. प्रशासनाने याकडे लक्ष घालून पुलाची उंची व पुलास संरक्षण कठडे लावण्याची मागणी उपसरपंच दीपक कालेकर यांनी केली आहे.








# राजकारण, वाद आणि प्रगती

अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रस्तावित पुतळा हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. महाराष्ट्रातील सर्वात आदरणीय ऐतिहासिक व्यक्तींपैकी एक असलेल्या शिवरायांचा सन्मान करणे हा उद्देश आहे. हे भव्य स्मारक, पूर्ण झाल्यावर, मराठा योद्धा राजाच्या शौर्याचे आणि वारशाचे प्रतीक असलेल्या जगातील सर्वात उंच पुतळ्यांपैकी एक असेल अशी अपेक्षा आहे. तथापि, हा प्रकल्प राजकीय वादांच्या भोवऱ्यांत सापडला आहे. या प्रकल्पासाठीची आर्थिक व्यवहार्यता, निधी आणि पर्यावरणीय परिणामांवर वादविवादांमध्ये अडकला आहे.

शिवस्मारक म्हणून ओळखला जाणारा हा प्रकल्प म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मुंबईच्या किनाऱ्यालगत अरबी समुद्रात उभारण्याची योजना आहे. प्रकल्प, पूर्ण झाल्यावर, 212 मीटर (अंदाजे 696 फूट) उंचीवर शिवरायांचा पुतळा उभा राहणे अपेक्षित आहे, ज्यामध्ये पायथ्याचा भागाचाही समावेश आहे. पुतळा एका विस्तृत कॉम्प्लेक्सने वेढलेला असेल, ज्यामध्ये ॲम्फिथिएटर, संग्रहालय, वाचनालय आणि अनेक ऐतिहासिक प्रसंग दर्शविणारी व्ह्यूइंग गॅलरी असेल, ज्यामुळे अभ्यागतांना व्यापक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुभव मिळेल. प्रकल्पाची एकूण अंदाजे किंमत सुमारे ₹3,600 कोटी रुपये (अंदाजे $480 दशलक्ष) आहे. महाराष्ट्र सरकार शिवस्मारकाची कल्पना केवळ शिवाजी महाराजांना श्रद्धांजली म्हणून नव्हे तर राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणूनही आखणी करण्यात आली आहे. स्मारकाचा प्रस्ताव 20 वर्षांपूर्वी 2004 मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सरकारने पहिल्यांदा मांडला होता. त्यानंतर भारतीय जनता पक्ष-शिवसेना युती, महाविकास आघाडी प्रशासन (शिवसेना [UBT]-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी [SP]) द्वारे त्याचा पाठपुरावा केला गेला आणि सध्याच्या शिवसेना-भाजप-NCP सरकारच्या अंतर्गत हा एक सततचा चर्चेचा मुद्दा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 24 डिसेंबर 2016 रोजी मरीन ड्राईव्ह समुद्र किनाऱ्यापासून 1.5 किलोमीटर अंतरावर असलेल्या प्रस्तावित जागेवर 'जल पूजन' केल्यानंतर




प्रकल्पाला गती मिळण्याची अपेक्षा होती. शिवस्मारक प्रकल्प पुर्णत्वास नेण्यास भाजपा सरकार आघाडीवर आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने प्रकल्पाचे नियोजन आणि अंमलबजावणीच्या टप्प्याला गती दिली. हा पुतळा मराठी अभिमानाचे प्रतीक आणि मराठा राजाच्या वारशाचा आदर आहे. या प्रदेशात रोजगार निर्मिती आणि पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प महत्वाचा असल्याचे भाजपाचे म्हणणे आहे. मुंबईच्या समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याच्या कल्पनेला अव्यवहार्य आहे असे म्हणत राज ठाकरेंनी जोरदार टीका केली आहे. हा पुतळा स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या उंचीला मागे टाकेल हा दावा त्यांनी फेटाळून लावला, मुंबईतील प्रस्तावित जागेच्या विपरीत, लिबर्टी पुतळा एका स्थिर खडकाळ बेटावर वसलेला आहे, ज्यासाठी कृत्रिम बेट तयार करणे आवश्यक आहे. ठाकरे यांनी अशा प्रकल्पाची किंमत ₹ 25,000 ते ₹ 30,000 कोटींच्या दरम्यान असल्याचा अंदाज व्यक्त केला आणि हा खर्च अवास्तव असल्याचा युक्तिवाद केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा वारसा त्यांनी बांधलेल्या भव्य किल्ल्यांमध्ये असताना पुतळ्यासाठी एवढ्या मोठ्या रकमेची गुंतवणूक करण्याची गरज काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पारंपरिक ऐतिहासिक किल्ल्यांचे नूतनीकरण करणे हे भावी पिढ्यांसाठी अधिक मोलाचे योगदान ठरेल, अशी सूचना ठाकरे यांनी केली.

शिवस्मारक प्रकल्पाबाबत पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. अरबी समुद्रात एवढ्या मोठ्या संरचनेच्या बांधकामामुळे सागरी जीवसृष्टी आणि किनारी परिसंस्थेला संभाव्य धोका निर्माण होईल असे त्यांचे म्हणणे आहे. याव्यतिरिक्त, मासेमारी समुदायांचे विस्थापन आणि त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. आत्तापर्यंत, पर्यावरणीय मंजुरी, आर्थिक समस्या आणि त्यांच्या उपजीविकेबद्दल संबंधित स्थानिक मासेमारी समुदायांचा विरोध यासह विविध कारणांमुळे प्रकल्पाला विलंब झाला आहे. 2023 मध्ये, महाराष्ट्र सरकारने, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) च्या नवीन युती अंतर्गत, 2024-2025 साठी हा प्रकल्प सुधारित अटींचा विचार करून पूर्ण होण्याच्या नियोजनाला आणि प्रकल्पाला गती दिली जाईल अशी घोषणा केली.


## थोडक्यात



### विविध उपक्रमांनी अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**धनकवडी (आरंभ पर्व) :** धनकवडी येथे सरकार बॉईज ग्रुपच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची 104 वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यामध्ये आरोग्य शिबीर रक्तदान शिबिर व भव्य आकर्षक मिरवणूक काढण्यात आली. धनकवडी येथील जानुबाई हॉलमध्ये नेत्रदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक प्रशांत लोखंडे व अतिश देवकुळे विकास गवळी ,अक्षय साळवी, अनिल थोरात ,किरण गायकवाड तसेच इतर पदाधिकारी व मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्व उपक्रमांना कार्यसिद्धी प्रतिष्ठानचे संस्थापक गिरिराज तानाजी सावंत यांचे सहकार्य लाभले. यावेळी त्यांनी मंडळाचे कौतुक केले. यावेळी दलित नेते माजी सभागृह नेते सुभाष जगताप माजी नगरसेवक राजेंद्र शिळीमकर माजी नगरसेविका वर्षाताई तापकीर व अनेक मान्यवर उपस्थित होते.

### बबीता काळे यांचे विधीज्ञ परीक्षेमध्ये यश



**सारोळे तालुका(आरंभ पर्व) :** सारोळे तालुका बार्शी येथील पारधी समाजातील एक सामान्य घराण्यातील सौ. बबीता लखन काळे यांनी विधीज्ञ परीक्षेमध्ये यश मिळवले आहेत. अत्यंत खडतर व हलाखीच्या परिस्थितीमध्ये आपलं शिक्षण पूर्ण करून विधीज्ञ परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. त्यांनी ह्यापूर्वी बी ए एम एस डब्ल्यू व आता एलएलबी असे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या ह्यां यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. गोरगरिबांच्या पीडितांच्या हक्कासाठी व न्यायासाठी आपण लढणार आहोत अशी प्रतिक्रिया ॲड.बबिता काळे यांनी दिली आहे. सध्या त्या सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये वकीली क्रिमिनल,फॅमिली व जुविनल यामध्ये प्रॅक्टिस करीत आहेत. त्यांना या परीक्षेसाठी पती श्री.लखन काळे,डॉ.जयश्री मेहता,ॲड.राजेंद्रसिंह बायस व डॉ. किर्तीपाल गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

### दरड कोसळल्याने भोरगिरी-भिमाशंकर कडे जाणारी वाहतूक ठप्प

**राजगुरुनगर (आरंभ पर्व) :** शिरूर-भिमाशंकर राज्य मार्गावर खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील शिरगांव येथे दरड कोसळल्याने या मार्गावरील भोरगिरी-भिमाशंकर कडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. सार्वजनीक बांधकाम विभागाच्या वतीने दरड हटवण्याचे काम सुरु झाले आहे. मागील चार दिवसांपासून खेड तालुक्याच्या पश्चिम भागात पावसाची संततधार सुरू असून बुधवार (दि. 24) पासून पावसाचे प्रमाण वाढले आहे. शिरगांव येथील रहिवाशांनी सांगीतले की, पावसाचा जोर वाढत असून गुरुवारी पहाटेच्या दरम्यान शिरूर- भिमाशंकर मार्गावर हि दरड कोसळली. यामुळे मोठ्या प्रमाणावर माती, दगड तसेच लहान-मोठी झाडे रस्त्यावर आल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून रस्ता निसरडा झाला आहे. तसेच रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी वाहत आहे. दरम्यान, या बाबत सार्वजनीक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता राम जाधव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगीतले की, दोन जेसीबी मशीनच्या साह्याने मलबा हटवण्याचे काम सुरु केले असून रस्ता वाहतुकूसाठी लवकरच खुला केला जाईल.

## खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये परिवर्तन होणार

### महाविकास आघाडीचाच आमदार होणार : काकासाहेब चव्हाण





**उमेदवारीच्या चर्चे विषयी बोलले असता त्यांनी आमच्या पक्षांमध्ये लोकशाही आहे प्रत्येकाला व कार्यकर्त्यांना आपला नेता आमदार व्हावा ही इच्छा असते व प्रत्येकाला उमेदवारी मागण्याचा अधिकार आहे. शेवटी पक्षश्रेष्ठी संधी देणार त्याच्या पाठीशी सर्वजण राहू व विजयी होऊ ही खात्री आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लवकरच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये खडकवासला मतदारसंघात मतदारांनी परिवर्तन करण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यामुळे कोणी जरी आले तरी आता बदल हा होणारच व महाविकास आघाडीचाच आमदार होणार अशी गर्जना खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष श्री काकासाहेब चव्हाण यांनी दैनिक आरंभ पर्वच्या इलेक्शन टॉक मध्ये केली.

महाराष्ट्रा सह देशामध्ये महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे वातावरण चांगले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेमध्ये या मतदारसंघांमध्ये मतदारांनी बदलाचे संकेत दिल्याने विद्यमान आमदारांना संधी मिळेल की नाही मिळेल याचीच सर्वत्र चर्चा सुरु आहे.

परंतु उमेदवार बदलो अथवा न बदलो खडकवासल्यामध्ये महाविकास आघाडीचाच आमदार होणार आहे. मतदारसंघातील अनेक प्रश्न जैसे थे असताना आमदारांनी घेतलेल्या भूमिका व अनेक वर्षापासून आमदार असूनही अनेक प्रश्न रेंगाळल्याने जनतेमध्ये नाराजी पसरली आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट गावांमध्ये टॅक्सचा प्रश्न, रस्त्यावरुन वाहणारे ड्रेनेजचे पाणी, सर्वत्र कचरा तसेच नुकत्याच झालेल्या पुरामध्येही प्रशासनाचे भयंकर दुर्लक्ष झाले. अशा अनेक समस्या भेडसाव मतदारसंघातील अनेक प्रश्नांवर जनता त्रस्त असताना विद्यमान आमदारांनी मात्र शांत राहणे पसंत केले. यामुळे जनतेमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

येत्या विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी म्हणून आम्ही लढणार आहोत. पक्ष पातळीवर वरिष्ठ जो निर्णय घेतील त्या उमेदवाराला विजयी करण्याचं धोरण महाविकास आघाडीतील सर्व कार्यकर्त्यांनी अवलंबले आहे.

या मतदारसंघावर खासदार शरदचंद्र पवार साहेब, खा.सुप्रियाताई सुळे यांचा चांगला प्रभाव आहे. त्याचसोबत मित्रपक्ष असणारे काँग्रेस व शिवसेना पक्षाचे असंख्य कार्यकर्ते मतदारसंघात आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघामधे आमचा विजय निश्चित आहे.

## मुलाच्या वडिलांचा टाहो

**शिवाजीनगर (दै. आरंभ पर्व)**

"पप्पा, मुसळधार पावसातही ठाण्याच्या पोलिस मैदान चाचणीत माझी कामगिरी चांगली झाली, मला चांगले मार्कदेखील मिळाले. आता मी लवकरच पोलिस होणार," असं शेवटचं बोलणं झाल्यानंतर दोन दिवसांतच वसतिगृहातील अस्वच्छतेने वेदांत सुभाष सोनुने (वय 21) या उमद्या तरुणाचा बळी गेला. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्याच्या शेलूद या गावात ग्रामपंचायतीमध्ये रोजगार सेवक म्हणून काम करणारे सुभाष सोनुने यांचा वेदांत हा मुलगा पुण्यातील घोले रस्ता येथील पुणे महापालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहात राहत होता. तो शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयातील कला शाखेत द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता.

## शेतकऱ्याच्या प्रसंगावधानामुळे वाचली गाडली गेलेली जनावरे

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील शिरगांव येथील नेकलेस धबधब्याजवळ कोसळेल्या दरडीत जनावरांचा गोठा गाडला गेला असुन यात तीन जनावरे गाडली गेली होती. परंतु शेतकरी अशोक लांघी यांनी भर पावसात तातडीने जनावरे मलब्यातुन ओढुन बाहेर काढल्याने मोठी हानी टळली. गेल्या चार दिवसांपासून खेड तालुक्याच्या पश्चिम पट्टयात



दमदार पाऊस सुरु असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. पावसाचा जोर सुरुच असून गुरुवारी पहाटेच्या दरम्यान शिरूर-भिमाशंकर मार्गावर हि दरड कोसळली. डोंगराचा काही भाग कोसळल्याने मोठ्या प्रमाणावर माती, दगड तसेच मोठी झाडे, लाईटचे खांब रस्त्यावर आले. स्थानिक शेतकरी अशोक लांघी यांचा रस्त्यालगत जनावरांचा गोठा असुन यात ही जनावरे होती. दरडीच्या मलब्यात जनावरे गाडली गेली होती. मात्र सुदैवाने तातडीने त्यांनी आपली जनावरे या मलब्यातुन ओढुन बाहेर काढल्याने मोठी हानी टळली. या घटनेत गोठ्याचे पुर्ण नुकसान झाले आहे.

## आ. भीमराव तापकीर यांच्याकडून कोट्यवधी रुपयांची कामे पूर्णत्वास

### या भागातील जनता महायुतीला पुन्हा संधी देईल : रुपेश घुले पाटील

**लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला व नांदेड गाव परिसर व भागात आमदार भीमराव अण्णा तापकीर यांचे योगदान निश्चित आहे.त्यांनी कोट्यवधी रुपयाची कामे या भागात केली आहेत.त्यामुळेच गेली अनेक दशकापासून मतदार त्यांच्या पाठीशी उभा आहे. असे मत भाजपा खडकवासला प्रभाग अध्यक्ष रुपेशजी घुले पाटील यांनी आरंभपर्व कडे व्यक्त केले.



इलेक्शन टॉक सदरामध्ये त्यांनी निवडणुकीच्या बाबतीत चर्चा केली. खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये आ.भीमराव अण्णा तापकीर यांनी त्यांच्या कामाने आपले स्थान मजबूत केले आहे. या भागातील मतदार हा भारतीय जनता पार्टी तसेच मित्रपक्ष यांच्याकडे पूर्वीपासून सहकार्य करतं आला आहे.

खडकवासला भागातील विकासात आमदार तापकीर यांचे योगदान आहे .त्यामुळेच आगामी विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीचा उमेदवार विजयी होईल असे मला एक कार्यकर्ता म्हणुन ठामपणे वाटते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या महायुती सरकारने केलेल्या जनकल्याणाच्या अनेक योजनाचा प्रभाव ह्यां आगामी विधानसभेत नक्कीच दिसून येईल. आमच्या नांदेड व नांदेड सिटी भागात अनेक विकासकामे झालीत. मी उपसरपंच असताना ड्रेनेज व इतर सर्व रस्त्याचे कॉंक्रेट करण व गावाचा झपाट्याने विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊनही पक्षाकडे व आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यामार्फत विकास कामे राबवण्यात आली.


अनेक शिबिरे मतदार नोंदणी लाडकी बहीण योजना फॉर्म भरुन संकलित ऑफिसमध्ये चालू असते. आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या सारखा शांत मनमिळावू लोकप्रतिनिधी होणे क्वचितच आहे. पक्ष देईल त्याप्रमाणे जबाबदारीने काम करू. असे मतं घुले पाटील यांनी व्यक्त केले. खडकवासला मतदारसंघांमध्ये विधानसभेसाठी तुमची चर्चा सुरु असल्याचे सांगताच घुले पाटील यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला. आगामी काळामध्ये आ. भीमराव अण्णा तापकीर व भारतीय जनता पार्टी यांचा मी कार्यकर्ता आहे. कार्यकर्ता म्हणूनच कार्य करणार आहे. भविष्यात संधी मिळतील तोवर आपलं काम करतं संघटन व माणसे जोडत राहणे हेच कर्तव्य समजतो.*

### घुले पाटील मोठे राजकीय प्रस्थ



खडकवासला भाजप प्रभाग अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांचे घरी पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात पाटीलकी त्यांच्याकडे आली.पणजोबा एकनाथ घुले पाटील मुलखी पाटील म्हणून नांदेडगा चा कारभार पहात .आजोबा मार्तंड घुले पाटील सरपंच पोलीस पाटिल म्हणून कारभार पाहत होते व वडील आबासाहेब घुले पाटिल बिनविरोध 15 वर्षे नांदेडगाव चे उपसरपंच म्हणून काम करीत होते.त्यामुळे ह्यां भागात घुले पाटील यांची राजकीय प्रतिमा मोठी आहे. त्यांचा या भागावर चांगला प्रभाव आहे. ह्यामुळे भाजपाला फायदा नक्कीच होत आहे.

# पुरस्थिती उपाययोजनांसाठी मुख्यमंत्री यांना प्रसन्न जगताप यांचे साकडे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरणातून जादा पाणी सोडल्याने सिंहगड रस्त्यावरील एकता नगर, निबंज पार्क, प्रगती पार्क,विठ्ठलनगरसह परिसरात निर्माण होणारी गंभीर पुरस्थिती रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात असे साकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माजी उपमहापौर अॅड. प्रसन्न जगताप यांनी घातले आहे.

गंभीर पुर स्थिती निर्माण होणाऱ्या मुठा नदी पात्रा लगत वारजे, सनसिटी ते विठ्ठलवाडी येथील विठ्ठल मंदिरा पर्यंत फ्लाय ओव्हर ब्रीज उभारून रस्ता तयार करण्यात यावा याकडे माजी उपमहापौर अॅड. प्रसन्न जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधले आहे. मुख्यमंत्र्यानी परवा सोमवारी सिंहगड रस्त्यावरील पुरग्रस्त भागाची पाहणी केली त्यावेळी माजी उपमहापौर प्रसन्न जगताप यांनी मुख्यमंत्र्या समोर दरवर्षी पावसाळ्यात पुरामुळे होणाऱ्या जिवीतहानी, वित्तहानी इतर व्यथा मांडल्या. यावेळी आमदार भिमराव तापकीर,आ. माधुरी मिसाळ यांच्यासह माजी नगरसेवक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.



फ्लाय ओव्हर ब्रिजमुळे त्यांच्याखाली येणाऱ्या कॉलमवर दोन कॉलम व संरक्षक भिंतीमुळे पूरस्थिती नियंत्रणात येणार आहे. तसेच पुराचा तडाखा बसणाऱ्या इमारतींचा पुनर्विकास करण्यात यावा.
- अॅड.प्रसन्न जगताप, माजी उपमहापौर

पुर्वी वारजे ते विठ्ठलवाडी असा नदी पात्रालगत शिवकालीन पायी रस्ता होता. 2010 मध्ये पालिकेत 14 कोटी रुपये खर्च करून या ठिकाणी संपूर्ण रस्ता तयार करण्यात आला होता.

मात्र सेवाभावी संस्थांनी या विरोधात हरित लवादाकडे तक्रार दाखल केली. त्यावेळी पालिकेचे अधिकारी व वकील सुरुवातीला दोन तीन वेळाच हरित लवादाकडे गेले. त्यानंतर याकडे पालिकेने दुर्लक्ष केले त्यामुळे हरितलवादाने तक्रारदारांच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे 14 कोटी रस्ता उकरून काढण्यासाठी पालिकेला 12 कोटी रुपयांचा खर्च करावा लागला. रस्ता उकरून काढल्या पासून या परिसरात गंभीर पूर परिस्थिती निर्माण होत असल्याचे माजी उपमहापौर प्रसन्न जगताप यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

# एसजीएल लॅब्सतर्फे हिरे आणि दागिन्यांबाबतच्या शैक्षणिक कार्यक्रमाचे पुण्यात आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिरे प्रमाणीकरण क्षेत्रातील प्रतिष्ठीत ब्रिटीश कंपनी एसजीएल लॅब्सच्या वतीने पुण्यात हिरे आणि दागिन्यांबाबतच्या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'डॅझल विथ डायमंड्स' नावाचा हा 14 वा कार्यक्रम असून, या वार्षिक कार्यक्रमाचा उद्देश 85 अब्ज डॉलरच्या रत्ने आणि दागिने उद्योगाचा आधारस्तंभ असलेल्या रिटेल विक्री संघांना शिक्षित करणे हे आहे.

'डॅझल विथ डायमंड्स' हा एक शैक्षणिक उपक्रम असून, जो उद्योगातील रिटेल विक्री संघांची महत्त्वपूर्ण भूमिका ओळखतो. रिटेल विक्री कर्मचाऱ्यांचे समर्पण आणि कौशल्य यामुळे रत्न आणि दागिने उद्योग 85 अब्ज डॉलरपर्यंत वाढला आहे. त्यांना सतत शिक्षित करणे आणि त्यांचे यश साजरे करणे महत्त्वाचे आहे, असे एसजीएल लॅब्सचे व्यवसाय विकास संचालक जिगर व्होरा यांनी यावेळी सांगितले.



'डॅझल विथ डायमंड्स' या पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमातील सकाळच्या सत्राचे उद्घाटन पीएनजी ज्वेलर्सचे श्री. सौरभ गाडगीळ यांच्या हस्ते झाले. या सत्रात पुण्यातील सर्व ज्वेलर्सच्या विक्री कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संध्याकाळी पुण्यातील प्रतिष्ठित ज्वेलर्सचा सहभाग असलेली दोन चर्चासत्रे झाली. या कार्यक्रमात फतेहचंद रांका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या चर्चासत्रातील पहिले चर्चासत्र पुरूषांचे वर्चस्व असलेल्या रत्ने आणि आभूषण उद्योगात महिलांचे नेतृत्व या विषयावर होते. यात या उद्योगात संचालक पदावर कार्यरत असणाऱ्या प्रमुख महिलांच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यात आला. त्यांचे योगदान आणि भावी पिढ्यांना मिळणारी प्रेरणा यावर प्रकाशझोत टाकण्यात आला. दुसरे सत्र परिवर्तनाचे एक दशक: परंपरागत व्यवसाय ते जनरल झेड नवकल्पना या विषयावर झाले. यात मिलेनियल्स आणि जेन झी त्यांचे ज्ञान आणि सर्जनशीलतेने उद्योगात कशी क्रांती घडवून आणत आहेत, आधुनिक नवकल्पनांसह पारंपरिक पद्धतींचा मिलाफ घडवित आहेत, यावर चर्चा करण्यात आली. या चर्चासत्रात नेहा लागू (लागू बंधू मोतीवाले), शनिका राठोड (राठोड ज्वेलर्स), शीतल रांका (रांका ज्वेलर्स), जिगर व्होरा (एसजीएल लॅब्स), अनुप लुनानी (सॉलिटोरिया), वास्तुपाल रांका (रांका ज्वेलर्स) आणि तनय राठोड (राठोड ज्वेलर्स) यांच्या प्रमुखांचा समावेश होता.

या कार्यक्रमात जिगर व्होरा यांनी प्रमाणीकरणाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, "उद्योग जसजसा विकसित होत जातो, तसतशी प्रमाणीकरणाची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण होत जाते. प्रमाणीकरणामुळे नैसर्गिक आणि प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेल्या रत्नांची, दागिन्यांची सत्यता आणि गुणवत्ता सुनिश्चित केली जाते. त्यामुळे ग्राहकांचा त्यांच्या खरेदीवरचा विश्वास वाढतो. एसजीएल लॅब्समध्ये आम्ही काळानुरूप होणाऱ्या बदलांशी जुळवून घेत आमची उत्कृष्टतेची आणि एकात्मतेची तत्त्वे कायम ठेवत उच्च दर्जाच्या प्रमाणीकरणासाठी वचनबद्ध आहोत.

# आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेसचा सर्वात मोठा आणि बहुप्रतिक्षित अँथे 2024 शिष्यवृत्ती कार्यक्रम दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लि. ने (AESL)आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम (ANTHE) या आपल्या प्रमुख शिष्यवृत्ती परीक्षेची 15 गौरवशाली वर्षे पूर्ण केली असून, या वर्षीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची घोषणा केली आहे. ही लोकप्रिय आणि सर्वाधिक मागणी असलेली परीक्षा इयत्ता सातवी-बारावीच्या विद्यार्थ्यांना रोख पुरस्कारांसह शंभर टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती मिळवण्याची संधी देते आणि वैद्यकीय किंवा अभियांत्रिकीमधील त्यांच्या यशस्वी करिअरची स्वप्ने




पूर्ण करण्यात मदत करते. या वर्षी, यात एक वैशिष्ट्यपूर्ण बक्षीसाचाही समावेश करण्यात आला आहे. या परीक्षेतील पाच उत्कृष्ट विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेतील फ्लोरिडा येथे असणाऱ्या केनेडी स्पेस सेंटरच्या पाच दिवसांची सहल मोफक मिळणार आहे. फ्लोरिडा येथे असलेले जॉन एफ. केनेडी स्पेस सेंटर हे नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशनच्या (नासा) अमेरिकेतील दहा फील्ड केंद्रांपैकी एक आहे.

ही शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना आकाशच्या विस्तृत कोचिंग प्रोग्रामचा फायदा होईल. याद्वारे विद्यार्थ्यांना नीट, जेईई, राज्य सीईटीसह एनटीएसई, ऑलिम्पियाड यांसारख्या विविध शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते.

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लि. चे (AESL)सीईओ आणि एमडी दीपक मेहरोत्रा म्हणाले, "असंख्य विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि क्षमतांमधील अंतर भरून काढण्यात आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झामने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

# "खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये नवा भिडू !!

## मयुरेश वांजळे विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक

**लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये एक महत्त्वाचा विधानसभा मतदारसंघ मानला जाणारा खडकवासला मतदारसंघांमध्ये रोज नवनवीन घडामोडी घडत आहेत. सर्व पक्षातील अनेक इच्छुकांनी आपापले लॉबिंग सुरू केले आहे. भाजप राष्ट्रवादी काँग्रेस sp राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना शिवसेना ubt मनसे सर्व पक्षांच्या इच्छुकांनी अभियाने उपक्रम सुरू केली आहेत.यामध्ये आता नवीन इच्छुकांची भर पडणार आहे. सोनेरी आमदार स्व.रमेशभाऊ वांजळे यांच्या परिवारानेही विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी सज्ज होत असल्याचे संकेत दिले आहेत. युवा नेते मयुरेश वांजळे विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याचे त्यांच्या सोशल मीडिया व बॅनर वरून स्पष्ट होत आहे. एकेकाळी खडकवासल्याची आमदारकी असलेले वांजळे कुटुंबाने स्व.रमेशभाऊ यांच्या निधनानंतर राजकीय प्रवाहात एक पाऊल मागे टाकले होते. पक्ष देईल त्या जबाबदारी स्वीकारत आपले अस्तित्व त्यांनी कायम ठेवले होते. जिल्हा परिषदेत शुक्राचार्य वांजळे व महानगरपालिकेचे सायली वांजळे कार्यरत होत्या. यामुळे मयुरेश वांजळे यांना जर विधानसभा लढवण्याची संधी मिळाली तर ते प्रतिस्पर्धेसमोर तगडे आव्हान निर्माण करतील अशीही शक्यता व्यक्त होत आहे. वांजळे कुटुंबीयांना मानणारा मतदार या मतदारसंघात असल्याने 25 व्या वयात विधानसभेत पोहोचण्याची किमया मयुरेश करतील का याकडे सर्वांचे लक्ष आहे. स्व. आमदार रमेश वांजळे यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये गेल्यानंतर पक्ष जो उमेदवार देईल त्या उमेदवाराचे विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकीमध्ये काम वांजळे परिवाराने केले आहे. पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका सायली वांजळे शिंदे पुणे महानगरपालिका सदस्य म्हणून चांगले काम केले. शुक्राचार्य वांजळे यांनी जिल्हा परिषदेमध्ये चांगले काम केले आहे. शिवाय मयुरेश वांजळे विविध सामाजिक उपक्रम राबवून जनतेची सेवा करण्याचा इरादा आपल्या कामाद्वारे दाखवून दिला आहे. शिवाय त्यांना माननारा युवावर्गही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांची मतदारसंघात क्रेझ वाढत असल्याची चर्चा होत आहे.आता विधानसभेच्या मैदानात उतरण्याची टायमिंग साधत खडकवासल्यातील पहिला युवा आमदार होण्याचा मान मयुरेश वांजळे यांना मिळणार का? याकडे सर्वांचे लक्ष आहे. मयुरेश वांजळे यांना पक्षाने उमेदवारी दिल्यास लक्षवेधी फाईट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



खडकवासल्या विकासासाठी प्रयत्न करायचेत : स्व.आमदार रमेश वांजळे यांचे मतदारसंघाचा विकास करण्याचं अपूर्ण काम त्यांचं स्वप्न करण्याची जबाबदारी आम्ही निश्चितपणे घेऊ. स्व. रमेशभाऊंचा वारसा लाभलेल्या ह्या मतदारसंघातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही इच्छुक आहोत. संधी मिळाल्यास खडकवासला विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला जाईल.
- मयुरेशदादा वांजळे, युवा नेते

# निविदा सुचना

### ग्रामपंचायत वाकी खुर्द, ता. खेड, जि. पुणे.

बी -१ , निविदा सुचना, सन २०२२-२०२३

ग्रामपंचायत वाकी खुर्द, ता. खेड, जि. पुणे. यांच्यातर्फे जी.प. पुणे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून दोन लिफाफा पध्दतीने सदर कामाचे सिलबंद निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय वाकी खुर्द यांचेकडून दि. ३०/ ०७/२०२४ ते ०५/०८/२०२४ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सायं. ४ :०० वा.पर्यंत या वेळेत देण्यात येतील. सदर निविदा दि. ०५/०८/२०२४ रोजी सायं. ४ : ३० वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारले जातील. व शक्य झाल्यास ०६/०८/२०२४ रोजी सकाळी ११: ०० वाजता किंवा लगतच्या मासिक सभेत लिफाफे उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कोरी निविदा रक्कम | निधीचा प्रकार | इसारा रक्कम | कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वाकी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे रंगकाम करणे. | २४९९९४/- | ५००/- | ग्रामनिधी | १% | ६ महिने | वर्ग १ ते ५ |

नियम व अटी : १) कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) ठेकेदाराने निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ३)पुणे जिल्हा परिषद पुणे व सार्वजनिक बांधकाम विभाग नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर निविदा २ मोहरबंद लिफाफ्यात स्वीकारल्या जातील. ४) सोबत ( अ ) जी.एस.टी. सर्टीफीकेट ( ब ) पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे.

**सही**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत वाकी खुर्द,**
**ता. खेड, जि. पुणे.**

**सही**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वाकी खुर्द,**
**ता. खेड, जि. पुणे.**

# निविदा नोटीस

### ग्रामपंचायत पाईट, ता. खेड जि. पुणे

निविदा नोटीस क्र.१ , सन २०२४-२०२५

ग्रामपंचायत पाईट , ता. खेड, जि. पुणे खालीलप्रमाणे कामांची सिलबंद निविदा जि. प. पुणे कडील योग्य त्या वर्गातील नोदणीकृत ठेकेदारांकडून दोन पाकीट पद्धतीने मागवित आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत पाईट कार्यालय येथे दि. ०१/०८/२०२४ ते ०८/०८/२०२४ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत सायं. ०४: ०० वाजेपर्यंत देण्यात येतील. व भरून पाठविलेल्या सीलबंद निविदा याच कालावधीत स्विकारण्यात येतील. सदर कामाबाबत प्राप्त निविदा मा. प्रशासक यांच्या आदेशाप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीचा प्रकार | कामाची रक्कम | निविदा रक्कम | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाईट लोडूंगवाडी येथे विरंगुळा केंद्र बांधणे. | जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ | ५ लक्ष | ५००/- | १००००/- | ६ महिने |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा , अधिकार ग्रामपंचायत पाईट यांनी राखून ठेवला आहे. २) सदर निविदा दोन मोहरबंद लिफाफ्यात स्वीकारल्या जातील. ३) सोबत (अ)नोंदणी प्रमाणपत्र (ब) जीएसटी रजिस्ट्रेशन (क) मागील तीन वर्षाचे आयकर प्रत (ड)पॅनकार्ड (इ ) सदर कामाचा अनुभव असल्याचा दाखला ४) इसारा रक्कम कोणत्याही पद्धतीने डी.डी./ आरटीजीएस द्वारे ग्रामपंचायत पाईट यांच्या खात्यावर जमा करून त्याची पावती किंवा डी.डी. लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही. त्याचप्रमाणे मूल्यांकनाप्रमाणे होणारी रक्कम ठेकेदारास मिळणार नाही शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम ठेकेदारास शासकीय वजावट करून मिळेल.

**सही**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पाईट,**
**ता. खेड जि. पुणे**

**सही**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत पाईट,**
**ता. खेड जि. पुणे**

# जाहीर निविदा

### ग्रामपंचायत चांडोली बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे

ग्रामपंचायत चांडोली बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे खालील नमूद कामे करार पद्धतीने करून घेणेची आहेत. याकामी नोंदणीकृत ठेकेदारांनी उक्त नोंदणी प्रमाणपत्र व आदी कागदपत्रे स्वतंत्र सीलबंद करणे. त्यातून (लखोटा क्र. १) आणि निविदा अन्य स्वतंत्र लखोट्यातून (लखोटा क्र. २) ग्रामपंचायत कार्यालयात खालील विहित मुदतीत सादर करणेचा आहेत. लखोटा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध झाल्यास तरच निविदेचा लखोटा क्र. २ उघडणेत येईल. लखोटा क्र. १ मध्ये उपरोक्त आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्यास लखोटा क्र. २ उघडला जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रू. | कंत्राटदाराचा वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | चांडोली बु.॥ ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे, ता. आंबेगाव, ग्रामा. ९ | १०,००,०००/- | सर्वसाधारण (खुला) | ६ महिने |
| २ | चांडोली बु.॥ गावठाण येथील विरंगुळा केंद्राचे उर्वरित काम करणे, ता. आंबेगाव | ५,००,०००/- | सर्वसाधारण (खुला) | ६ महिने |

वरील नमूद कामाचे कोरे निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत रक्कम रु. १००.०० फक्त भरणा केल्यानंतर उपलब्ध होईल. या कामी इच्छुक नोंदणीकृत ठेकेदारांनी आपल्या निविदा व उपरोक्त नमूद कागदपत्रे यांचे स्वतंत्र लखोटे तयार करून त्याला क्रमांक नमूद करून दि. १३/०८/२०२४ रोजी दुपारी ठिक ५.०० वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करण्याचा आहे. सदर कामी विहित मुदतीत न आलेल्या व बयाणा रक्कम न भरलेल्या या नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे असणारा लखोटा सादर न केलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. प्राप्त निविदा लगतचे मासिक मिटिंगमध्ये उघडण्यात येतील. प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे वा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा हक्क ग्रामपंचायतने राखून ठेवलेला आहे.

**सही**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चांडोली बुद्रुक,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे**

**सही**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चांडोली बुद्रुक,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे**

## थोडक्यात



### जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**सारोळे तालुका (आरंभ पर्व) :** सारोळे तालुका बार्शी येथे सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न झाले.तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादनही करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये 51 जणांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरामध्ये भगवंत रक्तपेढी बार्शी यांनी रक्त संकलन केले. यावेळी सरपंच बाळराजे गाटे, मनसे तालुकाध्यक्ष आप्पाभाई गाटे, उद्योजक सुधाकर जाधव प्रा .निळकंठ गाटे, प्रदीप जाधव, वासुदेव गाटे, विनोद डोके, सयाजी चौधरी, सतीश गाटे लक्ष्मण ठोंबरे, विजय महापुरे दयावान भोसले, महेश कांबळे, अनुभव गाटे परमेश्वर भोसले, दिगंबर भोसले,बबलू भोसले दहिवडी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# खडकवासल्यात निवडून यायची तयारी करा!

- पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे इच्छुकांना आदेश
- खडकवासला मतदारसंघाच्या जागेवरून सस्पेन्स वाढण्याची शक्यता



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नुकताच शिवसंकल्प मेळावा गणेश कला क्रीडा मंच येथे झाला. ह्यावेळी खडकवासला विधानसभा मतदारसंघातर्फे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला.

त्यावेळी कार्यकर्त्यांनी त्यांना खडकवासला मागून घ्या असे आवाहन करताच लगेच त्यांनी निवडून येण्याची तयारी करा असा इच्छुकांना आदेश वजा संकेत दिला. त्यामुळे खडकवासला विधानसभा मतदारसंघातील जागेबाबत सस्पेन्स वाढण्याची शक्यता आहे. ही विधानसभा निवडणुक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे काँग्रेस आय व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व मित्रपक्ष हे महाविकास आघाडी म्हणून सामोरे जाणार आहेत.

त्यात खडकवासला विधानसभेची ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची परंपरागत जागा आहे. ह्यामध्ये विविध उमेदवारांना संधी दिली मात्र त्यात त्यांना यश आले नाही.

मागील विधानसभा निवडणुकीमध्ये सचिन दोडके यांचा निसटता पराभव झाला होता. शिवाय खडकवासला विधानसभा मतदारसंघात पूर्वीपासून शिवसेनेचे अस्तित्व आहे.त्यामुळेच कदाचित हा मतदारसंघ आपल्याकडे घ्या अशी विनंती कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

शिवसेनेकडून माजी तालुकाप्रमुख संदीप मते पाटील, खडकवासला विधानसभा अध्यक्ष नितीन वाघ , पंचायत समिती सदस्य बाळासाहेब मोकाशी आदीजण इच्छुक आहेत.

ठाकरे यांच्या ह्यां संवादाचा हा व्हिडिओ खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये व्हायरल होत आहे. त्यामुळे चर्चांना उधाण आले आहे. महा विकास आघाडी मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडे सर्वाधिक इच्छुक आहेत.

या परिस्थितीमध्ये ते विधानसभा मतदारसंघ सोडणार का? पुणे जिल्ह्यातील कोणती जागा शिवसेनेला सुटणार कीं अदलाबदली होणार आगामी काळात याचे उत्तर मिळणार आहे.

### विधानसभा लढवण्यासाठी नव्हे जिंकण्यासाठी प्रयत्न करु

खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये पूर्वीपासून शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराला मानणारा मतदार आहे. ह्यां विधानसभा मतदारसंघाची रचना होण्यापूर्वी शिवसेनेचे आमदार शरद ढमाले हे होते.त्यामुळे मतदारसंघांमध्ये शिवसेनेचें अस्तित्व आहे.आम्ही निवडणूक लढवण्यासाठी नाहीतर जिंकण्यासाठी तयारी करत आहोत.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे योग्य निर्णय घेतील.या मतदारसंघातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी मी इच्छुक आहे.

- संदीप मते पाटील, माजी तालुकाप्रमुख हवेली, विधानसभेचे इच्छुक उमेदवार

### शिवसैनिकांना योग्य न्याय मिळेल

खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रभावी काम आहे. महाविकास आघाडी म्हणून जरी लढत असलो तरीही आम्हालाही जागा मागण्याचा अधिकार आहे. पक्षप्रमुख योग्य निर्णय घेतील. शिवसैनिकांना योग्य न्याय मिळेल अशी आशा आहे.

- नितीन वाघ, खडकवासला विधानसभा प्रमुख




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.